श्री.जयदिप डाकरे सर

माझा अभ्यास

Study From Home

श्री.प्रविण डाकरे सर

Subscribe

इयत्ता – पाचवी (31 डिसेंबर) विषय - मराठी

Subscribe

डिसेंबर महिन्यातील तीन पाठ पूर्ण झालेले असून या पाठावरील सराव करण्यासाठी शेवटी ऑनलाईन टेस्ट दिलेल्या आहेत. त्या टेस्ट चा सराव करावा. उजळणीसाठी मागील तारखेच्या pdf वापराव्यात.

इयत्ता – पाचवी विषय – गणित

9. दशांश अपूर्णांक

उदा. (2) बेरीज करा : 45.83 + 167.4

$$\begin{array}{r} 45.83 \\ +\ 167.4 \\ \hline \end{array}$$

अंकांची स्थाने आणि दशांशचिन्हे एकाखाली एक येतील अशा रीतीने संख्यांची मांडणी केली.

	1	1	1			
		4	5	.	8	3
+	1	6	7	.	4	0
	2	1	3	.	2	3

$\frac{4}{10} = \frac{4\times10}{10\times10} = \frac{40}{100}$, म्हणून अपूर्णांकांचे छेद समान होण्यासाठी 167.4 हे 167.40 असे लिहिले. नंतर दोन्ही अपूर्णांकांची बेरीज केली. **नेहमीप्रमाणे सर्वांत कमी स्थानिक किमतीच्या अंकांची बेरीज करून क्रमाने मोठ्या स्थानिक किमतीच्या अंकांची बेरीज केली.**

उदा. (3)

$$\begin{array}{rl} 10.46 & \text{रुपये} \\ +\ 35.92 & \text{रुपये} \\ \hline 46.38 & \text{रुपये} \end{array}$$

उदा. (4)

$$\begin{array}{rl} 48.80 & \text{मी} \\ +\ 2.57 & \text{मी} \\ \hline 51.37 & \text{मी} \end{array}$$

उदा. (5)

$$\begin{array}{rl} 7.5 & \text{सेमी} \\ +\ 14.2 & \text{सेमी} \\ +\ 9.6 & \text{सेमी} \\ \hline 31.3 & \text{सेमी} \end{array}$$

उदाहरणसंग्रह 41

1. दशांश अपूर्णांकात रूपांतर करून खालील बेरजा करा.

(1) दीड मीटर आणि अडीच मीटर (2) पावणेपाच रुपये आणि सव्वासात रुपये

(3) साडेसहा मीटर आणि पावणेतीन मीटर

2. (1) 23.4 + 87.9 (2) 35.74 + 816.6 (3) 6.95 + 74.88 (4) 41.03 + 9.98

3. (1) 51.4 सेमी + 68.5 सेमी (2) 94.7 मी + 1738.45 मी (3) 5158.75 रुपये + 841.25 रुपये

9. Decimal Fractions

Example (2) Add : 45.83 + 167.4

```
  45.83
+ 167.4
```

We arrange the numbers so that the places and decimal points come one below the other.

	1	1	1			
		4	5	.	8	3
+	1	6	7	.	4	0
	2	1	3	.	2	3

$\frac{4}{10} = \frac{4\times10}{10\times10} = \frac{40}{100}$ Therefore, to make the denominators of the fractions equal, 167.4 is written as 167.40 and then the fractions are added.

As usual, the digits with the smallest place values are added first and then those with bigger place values are added serially.

Example (3)
```
  10.46 Rupees
+ 35.92 Rupees
  46.38 Rupees
```

Example (4)
```
  48.80 m
+  2.57 m
  51.37 m.
```

Example (5)
```
  7.5 cm
+ 14.2 cm
+  9.6 cm
  31.3 cm
```

Problem Set 41

1. Convert the following into decimal fractions and add them.
   (1) 'One and a half metre' and 'two and a half metres'
   (2) 'Four and three quarter rupees' and 'seven and a quarter rupees'
   (3) 'Six and a half metres' and 'three and three quarter metres'.
2. (1) 23.4 + 87.9 (2) 35.74 + 816.6 (3) 6.95 + 74.88 (4) 41.03 + 9.98
3. (1) 51.4 cm + 68.5 cm (2) 94.7 m + 1738.45 m (3) ₹ 5158.75 + ₹ 841.25

Read and solve.

डिसेंबर महिन्यातील घटक पूर्ण झालेले असून उजळणीसाठी मागील तारखेच्या pdf वापराव्यात.

१६. पाणी

आपण काय शिकलो?

या महिन्यातील शेवटचा घटक.. सराव

- पाण्यात सजीवांसाठी घातक पदार्थ मिसळले की पाणी प्रदूषित होते.
- जलसाठ्यांचे प्रदूषण होऊ नये म्हणून त्यात सांडपाणी सोडण्यापूर्वी त्यावर अनेक प्रक्रिया करतात.
- पाणीपुरवठा करण्यापूर्वी गावाच्या जलशुद्धीकरण केंद्रात पाण्यात विरघळलेले व न विरघळलेले पदार्थ वेगळे केले जातात तसेच पाण्याचे निर्जंतुकीकरण केले जाते.
- दीर्घकाळ पाऊस पडला नाही, तर दुष्काळ पडतो.
- दुष्काळग्रस्त भागांतील मानव, प्राणी, वनस्पती या सर्वांना दुष्काळाचा तडाखा बसतो.
- पाणी अडवून, जिरवून किंवा साठवून पावसाळ्यानंतरच्या काळात उपलब्ध करून देणे, याला जलव्यवस्थापन म्हणतात.

स्वाध्याय

१. काय करावे बरे ?

जमिनीच्या उतारामुळे बागेतील माती पाण्याबरोबर वाहून जात आहे.

२. जरा डोके चालवा.

पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यासाठी रस्ते व पादचारी मार्ग कसे बांधावे?

३. प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) दुष्काळात कोणती परिस्थिती निर्माण होते?

(आ) पावसाळ्यानंतरही पाणी उपलब्ध होण्यासाठी शासन आणि नागरिक कोणती कामे करतात?

(इ) पावसाचे पाणी कशासाठी अडवावे लागते?

(ई) जलव्यवस्थापन कशाला म्हणतात?

४. चूक की बरोबर ते सांगा. चुकीचे विधान दुरुस्त करून पुन्हा लिहा.

(अ) पावसाचे पाणी आपल्याला वर्षभर मिळते.

(आ) शासनातर्फे दुष्काळग्रस्त भागांतील लोकांना आणि प्राण्यांना सुरक्षित जागी तात्पुरते हालवले जाते.

उपक्रम

१. तुमच्या पालकांशी किंवा मित्रांशी बोलून, वर्तमानपत्रांतून किंवा संकेतस्थळांवरून आपल्या राज्यात कोणत्या वर्षी दुष्काळ पडला होता, आणि दुष्काळावर मात करण्यासाठी कोणते उपाय योजले होते, याची माहिती मिळवा.

२. वर्तमानपत्रांत छापून आलेली वाहत्या पाण्याची, साचलेल्या पाण्याची छायाचित्रे जमा करा.

* * *

68FV2N

वाचा व समजून घ्या. ऑनलाईन टेस्ट

इयत्ता – पाचवी विषय – परिसर अभ्यास-2

डिसेंबर महिन्यातील पाठ पूर्ण झालेले असून या पाठावरील सराव करण्यासाठी शेवटी ऑनलाईन टेस्ट दिलेल्या आहेत. त्या टेस्ट चा सराव करावा. उजळणीसाठी मागील तारखेच्या pdf वापराव्यात.

इयत्ता – पाचवी विषय – हिंदी

डिसेंबर महिन्यातील पाठ पूर्ण झालेले असून या पाठावरील सराव करण्यासाठी उजळणीसाठी मागील तारखेच्या pdf वापराव्यात.

माझा ऑनलाईन अभ्यास – सराव चाचणी

इयत्ता पाचवी - मराठी	महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर
ऑनलाईन टेस्ट अपडेट होत आहेत.	
14. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज	Click Here
15. आपल्या समस्या - आपले उपाय	Click Here
16. स्वच्छतेचा प्रकाश	Click Here
इयत्ता पाचवी - गणित	महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर
विभाज्य आणि विभाजक –भाग 1	Click Here
विभाज्य आणि विभाजक –भाग 2	Click Here
दशांश अपूर्णांक	लवकरच
इयत्ता पाचवी - परिसर अभ्यास - 1	महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर

14. वाहतूक	Click Here
15. संदेशवहन व प्रसारमाध्यमे	Click Here
16. पाणी	Click Here
इयत्ता पाचवी - परिसर अभ्यास - 2	महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर
6. अश्मयुग-दगडाची हत्यारे	Click Here
इतर टेस्ट लवकरच अपडेट होतील.	

Subscribe

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे

वेब स्त्रोत-'ई-बालभारती'

सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in